# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट ता. ०९/०१/२०२३

## लग्न सभारंभात चोरी केलेले २६ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे जप्त - हिंजवडी पोलीस तपास पथकाची कामगीरी

दि. ०६/१२/२०२२ रोजी ऑर्चिड हॉटेलमध्ये लग्न सभारंभातुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने लग्नातील लोकांची नजर चुकवुन लग्नातील मुलीकडील ६५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे व ९,००,०००/- रोख रक्कम चोरी करुन नेल्याबाबत हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं ११८५/२०२२, भादवि कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे. मा.पोलीस उप आयुक्त परि २ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत हिंजवडी पोलीस ठाणेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.विवेक मुगळीकर यांना सुचना दिल्या होत्या.

तपास पथकातील सहा. पोलीस निरीक्षक सागर काटे व राम गोमारे असे तपास पथकातील अंमलदारांसह दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना ऑर्चिड हॉटेलमधील लावण्यात आलेल्या सी.सी.टि.व्हि.फुटेजची बारकाईने पाहणी करीत असताना दोन अनोळखी इसम हे लग्न सभारंभात येवुन लोकांची नजर चुकवुन फिर्यादी यांचे आईने सोन्याचे दागिणे व रोख रक्कम ठेवलेली पर्स घेवुन जात असताना दिसले. त्यावेळी सदरचे इसमांबाबत गोपनीय सुत्रांकडुन माहिती काढली असता तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे यांना त्यांचे गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, अशाप्रकारे लग्न सभारंभात मध्यप्रदेश राजगढ जिल्हातील असु शकतात. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सा़ो,हिंजवडी पोलीस ठाणे यांनी सदर ठिकाणी जावुन खात्री करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास सांगितली असता वरिष्ठांचे परवानगीने तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक राम गोमारे, पो.हवा.८७३ कैलास केंगले पो.हवा.९५८ विक्रम कुदळ, पो.शि.२४०० दत्तात्रय शिंदे व पो.शि.२४०१ ओमप्रकाश कांबळे असे बोडा पोलीस ठाणे जि.राजगढ राज्य मध्यप्रदेश येथे जाऊन १७ दिवस वास्तव्य करून, कौशल्याने कसुन तपास करून चोरी करणारे इसम हे बोडा पोलीस ठाणे हद्दीतील ग्राम कडीयासांसी, ता.पचोर, जि.राजगढ राज्य मध्यप्रदेश येथील इसम नामे १)रितीक महेश सिसोदिया वय २० वर्षे व २) वरुण राजकुमार सिसोदिया वय २३ वर्षे हे असल्याचे समजले. तेथील विशेष गोपनीय बातमीदाराकडुन बातमी मिळाली की सदरची चोरी ही आरोपी नामे १)रितीक महेश सिसोदिया वय २० वर्षे २) वरुण राजकुमार सिसोदिया वय २३ वर्षे व शालु रगडो धपानी वय २८ वर्षे व ४) शाम लक्ष्मीनारायण सिसोदिया वय ३८ वर्षे सर्व रा.ग्राम कडीयासांसी ता.पचोर ठाना बोडा जि.राजगढ राज्य मध्यप्रदेश यांनी मिळुन केली आहे. तसेच चोरी केलेल्या मालापैकी काही माल हा आरोपी यांचे घरी असलाचे समजले. स्थानिक पोलीसांचे मदतीने वरील चारही आरोपींचा शोध घेतला. परंतु ते राहते घरी मिळुन आले नाहीत, त्यामुळे स्थानिक पोलीसांचे मदतीने वरील आरोपींचे नातेवाईकांकडे कौशल्याने तपास करून दाखल गुन्हयातील **चोरी गेलेल्या सोन्याचे दागिन्यांपैकी २६ लाख रुपये किंमतीचे ५२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे जप्त केले आहेत**. दाखल गुन्हयातील आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांचेवर विविध राज्यात चोरीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. आरोपींचा व उर्वरीत दागिन्यांचा शोध चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री विनयकुमार चौबे साो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड,मा.श्री.मनोज लोहिया साो,सह पोलीस आयुक्त, मा.श्री. डॉ संजय शिंदे साो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड, मा. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डॉ.विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रमुख सपोनि, सागर काटे,राम गोमारे, पोउनि रमेश पवार, पोलीस अंमलदार,बाळकृष्ण शिंदे, बंडु मारणे, कैलास केंगले, विक्रम कुदळ, योगेश शिंदे, कुणाल शिंदे, बापुसाहेब धुमाळ, अरूण नरळे, चंद्रकांत गडदे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, सुभाष गुरव, अमर राणे, ओमप्रकाश कांबळे, दत्ता शिंदे, सागर पंडीत यांनी केली आहे.

**( डॉ.काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप-आयुक्त परि-२,**
**पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,**